विराटशिवाय 'टेस्ट' झाली फिकी : प्रीती झिंटाने बोलून दाखवली मनातली गोष्ट

मुंबई । वृत्तसंस्था

भारतीय संघातील स्टार क्रिकेटर विराट कोहली याने १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा मोठा निर्णय घेतलाय. त्याने अचानक घेतलेल्या निर्णयामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसलाय. काहींच्या मनात तर आता कसोटी क्रिकेट पाहायची कुणासाठी? असा प्रश्न पडलाय. त्यातील सर्वात आघाडीचे नाव म्हणजे आयपीएलमधील पंजाब किंग्ज संघाची सह मालकीण आणि बॉलिवूड अभिनेत्री प्रीती झिंटा. तिने सोशल मीडियाच्या माध्यमातून विराट कोहलीच्या कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीसंदर्भातील मनातील भावना व्यक्त केली आहे.

मी फक्त विराटसाठी कसोटी पाहायचे

१३ मे रोजी प्रीती झिंटा हिने एक्स अकाउंटवरील खास चॅट सेशनच्या माध्यमातून आपल्या चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी तिला विराट कोहलीच्या निवृत्तीची बातमी कळल्यावर पहिली प्रतिक्रिया काय होती? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर अभिनेत्रीने मी फक्त विराटसाठीच कसोटी पाहायचे, असे उत्तर दिले. एवढेच नाही तर आता कसोटीत पहिल्यासाठी मजा उरणार नाही, असेही तिने बोलून दाखवले आहे.

कसोटीतील 'टेस्ट'च फिकी झाली

विराट कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यामुळे प्रीतीच नाही तर अनेक क्रिकेट चाहत्यांच्या मनातील भावना ही कसोटीतील 'टेस्ट' फिकी झालीये, अशीच आहे. कोहलीने कसोटीतील १४ वर्षांच्या प्रवासात १२३ सामन्यांत ३० शतके आणि ३१ अर्धशतकासह ९२३० धावा केल्या. महान क्रिकेटरपैकी एक असलेल्या विराट कोहलीचे नाव कसोटीत १० हजार धावा करणाऱ्या क्लबमध्ये नसल्याची खंतही सातत्याने सतावत राहिल.



टेस्ट कॅप्टन्सीमध्ये नवा ट्विस्ट!

माजी निवडकर्ते कृष्णमाचारी श्रीकांत यांनी सुचवले केएल राहुलचे नाव

मुंबई । वृत्तसंस्था

रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर कसोटी संघाच्या नवीन कर्णधाराबद्दल चर्चा सुरू आहे. काही वृत्तांमध्ये दावा करण्यात आला आहे की ही जबाबदारी शुभमन गिलकडे सोपवली जाईल आणि यासाठी या तरुण खेळाडूशी चर्चा देखील झाली आहे. त्याच वेळी, अनेक दिग्गज खेळाडू जसप्रीत बुमराहच्या समर्थनात आहेत.

बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये बुमराह संघाचा उपकर्णधार होता आणि रोहितच्या अनुपस्थितीत त्याने संघाचे नेतृत्वही केले होते. या सर्व चर्चांमध्ये, माजी निवडकर्ता कृष्णमाचारी श्रीकांत यांनी केएल

राहुलच्या रूपात एका नवीन दावेदाराचे नाव दिले आहे, ते म्हणतात की हा खेळाडू चौथ्या क्रमांकावर विराट कोहलीची जागा घेऊ शकतो.

माजी भारतीय खेळाडूचे म्हणणे आहे की शुभमन गिलचे प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान निश्चित नाही, मग त्याला कर्णधारपदाची जबाबदारी

कशी दिली जाऊ शकते. त्यांनी सुचवले की जसप्रीत बुमराहला संघाचा कर्णधार बनवावे, जर तो उपलब्ध नसेल तर केएल राहुल किंवा ऋषभ पंत यापैकी एकाने ही जबाबदारी स्वीकारावी. तो कसोटी क्रिकेटमध्येही खेळेल की नाही हे निश्चित नाही. जसप्रीत बुमराहला कर्णधारपद द्यावे आणि जर तो तंदुरुस्त नसेल किंवा कोणत्याही सामन्यासाठी उपलब्ध नसेल तर केएल राहुल किंवा ऋषभ पंत यांनी भारताचे नेतृत्व करावे, असे श्रीकांत यांनी सांगितले.

शुभमन गिलची कामगिरी परदेशात काही खास राहिलेली नाही. तिसऱ्या क्रमांकावर खेळताना त्याने १२ डावांमध्ये सरासरी १९ धावा केल्या आहेत, त्यादरम्यान त्याने एकही अर्धशतक झळकावलेले नाही. सलामीवीर म्हणून, तो परदेशात सरासरी ३१.५४ धावा करतो, परंतु इंग्लंडमध्ये त्याची कामगिरी अजिबात चांगली राहिलेली नाही. त्याच्या नावावर ६ डावांमध्ये फक्त ८८ धावा आहेत.

टीम इंडियाची स्मृती मानधना नंबर वन 'ताज'सह मिरवण्याच्या तयारीत

मुंबई । वृत्तसंस्था

श्रीलंकेत नुकत्याच पार पडलेल्या तिरंगी वनडे मालिकेत स्मृती मानधना हिने फायनलमध्ये शतकी खेळी केली होती. या विक्रमी शतकी खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघाने फायनल मारली. याशिवाय हे शतक स्मृती मानधनाच्याही फायद्याचे ठरले आहे. आयसीसीच्या महिला वनडे रँकिंगमध्ये ती आता दुसऱ्या स्थानावर पोहचलीये.

तिरंगी वनडे मालिकेतील फायनलमध्ये स्मृती मानधना हिने १०१ चेंडूत ११६ धावांची खेळी केली होती. या कामगिरीसह आयसीसी रँकिंगमध्ये ती ७२७ रेटिंग पॉइंट्स मिळवत दुसऱ्या स्थानी विराजमान झालीये. स्मृती मानधना ही नंबर वनच्या अगदी जवळ असून ती लवकरच हा डाव साध्य करेल, असे दिसते. महिला क्रिकेटमधील वनडेत नंबर वन असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड आणि स्मृती मानधना या दोघींमध्ये फक्त ११ गुणांचे अंतर आहे.

आयसीसीच्या महिला वनडे रँकिंगमध्ये जेमिमा रॉड्रिग्जलाही फायदा झाला आहे. ती पाच स्थानांच्या सुधारनेसह १५ स्थानावर पोहचली आहे. भारताची फिरकीपटू स्नेह राणा हिने देखील रँकिंगमध्ये चार स्थानांच्या सुधारणेसह ३४ व्या स्थानावर झेप घेतलीये. ऑलराउंडर खेळाडूंच्या यादीत दीप्ती शर्मा टॉप ५ मध्ये पोहचली आहे.

गुजरात अन् आरसीबीचे टेन्शन वाढले

ईसीबीच्या निर्णयामुळे दिग्गज खेळाडू मुकणार?

मुंबई । वृत्तसंस्था

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने नव्याने संघ बांधणीसाठी पुढाकार घेतला असून हॅरी ब्रूककडे सर्व फॉर्मेटची जबाबदारी दिली आहे. तसेच झिम्बाब्वे विरूद्धच्या एकमेव कसोटी, तसेच वेस्ट इंडिजविरुद्ध तीन वनडे आणि तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी संघ घोषित केला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताच्या निराशाजनक कामगिरीनंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने पावले उचलली आहेत. जोस बटलरने कर्णधारपद सोडले आणि हॅरी ब्रूकला त्याच्या जागी धुरा सोपवली. इंग्लंड संघासाठी हॅरी ब्रूकने आयपीएल २०२५ स्पर्धेत भाग घेतला नाही. इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका २९ मे ते ३ जून दरम्यान आहे. त्यानंतर ६ जूनला टी२० मालिका सुरु होईल. १० जूनला शेवटचा सामना खेळवला जाईल. इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात २९ मे ते ३ जून दरम्यान वनडे मालिका असल्याने आयपीएलवर परिणाम होणार आहे.

जोस बटलर (गुजरात टायटन्स), जोफ्रा आर्चर (राजस्थान रॉयल्स), विल जॅक्स (मुंबई इंडियन्स) आणि जेकब बेथेल (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू) यांचा दोन्ही संघात समावेश आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे फिल साल्ट फक्त ६ जूनपासून सुरू होणाऱ्या टी-२० मालिकेत सहभागी होईल. त्यांची उपलब्धता ३ जून रोजी होणाऱ्या आयपीएलच्या अंतिम सामन्यावर अवलंबून असेल. त्यामुळे प्लेऑफच्या शर्यतीत असलेल्या गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि मुंबई इंडियन्सची धाकधूक वाढली आहे. कारण २९ मे पासून आयपीएल प्लेऑपचे सामने सुरु होतील.

रोहित-विराट ऑगस्टमध्ये मैदानावर दिसणार

मुंबई । वृत्तसंस्था

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आता ते फक्त एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळताना दिसणार आहेत. भारताला २०२५-२०२६ मध्ये अनेक एकदिवसीय मालिका खेळायच्या आहेत. चाहते या गोष्टीसाठी उत्सुक आहेत की रोहित-विराट त्यांना टीम इंडियासाठी एकदिवसीय सामन्यांमध्ये कधी-कधी खेळताना दिसतील. चला तर मग पाहूया भारताचे २०२५-२०२६ मधील एकदिवसीय सामन्यांचे संपूर्ण वेळापत्रक.

भारतीय संघ २०२५-२०२६ मध्ये एकूण ९ एकदिवसीय मालिका खेळणार आहे. प्रत्येक एकदिवसीय मालिकेत एकूण ३ सामने असतील. म्हणजेच भारत एकूण

२४ सामने खेळणार आहे. टीम इंडियाचा पुढील एकदिवसीय सामना ऑगस्टमध्ये बांगलादेशविरुद्ध आहे. ज्याची सुरुवात १७ ऑगस्टपासून होईल आणि तो २३ ऑगस्टपर्यंत चालेल. रोहित शर्मा आणि विराट कोहली या मालिकेत खेळताना दिसू शकतात. यानंतर भारत ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळेल. मग नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ मध्ये भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकूण ३ एकदिवसीय सामने खेळायचे आहेत. म्हणजेच यावर्षी भारत फक्त ९ एकदिवसीय सामने खेळणार आहे.

परदेशी खेळाडू परतण्यास करतायत टाळाटाळ

मुंबई । वृत्तसंस्था

१७ मे पासून पुन्हा सुरू होणाऱ्या आयपीएलसाठी बीसीसीआय आणि आयपीएल संघ परदेशी बोर्डावर त्यांचे खेळाडू पाठवण्यासाठी दबाव आणत आहेत. तथापि, भारत-पाकिस्तान लष्करी संघर्षामुळे अजूनही सुरक्षेच्या चिंता आहेत. बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आयपीएलचे सीओओ हेमांग अमीन यांना सुरक्षेच्या चिंता दूर करण्यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाशी वैयक्तिकरित्या बोलण्यास सांगितले आहे.

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही

खेळाडू परत येण्याची बीसीसीआयला आशा

परदेशी बोर्डांशी खाजगीरित्या बोलत आहोत तर संघ त्यांच्या खेळाडूंशी थेट संपर्कात आहेत. आम्हाला आशा आहे की त्यापैकी बहुतेक परत येतील. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने भारतात परतायचे की नाही याचा निर्णय खेळाडूंवर सोडला आहे.

पंजाब किंग्जचे ऑस्ट्रेलियन अष्टपैलू मार्कस स्टोइनिस आणि जोश इंग्लिस हे परतण्याची शक्यता कमी आहे तथापि, मुख्य प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग यांना पटवून देण्याचा प्रयत्न करत आहेत. ऑस्ट्रेलियाचे झेवियर बार्टलेट, आरोन हार्डी, अफगाणिस्तानचे अझमतुल्ला उमरझाई आणि दक्षिण आफ्रिकेचे मार्को जानसेन पुनरागमन करू शकतात. चेन्नई आणि सनरायझर्स हैदराबाद प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत तर पंजाब प्लेऑफमध्ये पोहोचू शकतो. सनरायझर्स संघात कर्णधार पॅट कमिन्स आणि ट्रॅव्हिस हेड यांचे पुनरागमन होण्याची अपेक्षा आहे.

ईशान किशन इंग्लंड दौऱ्यावर जाणार

दोघांच्या दुखापतीमुळे विकेटकीपर बॅट्समनला लॉटरी!

मुंबई । वृत्तसंस्था

भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामानंतर बीसीसीआयने १२ मे रोजी आयपीएलच्या १८ व्या मोसमातील उर्वरित १७ सामन्यांचं सुधारित वेळापत्रक जाहीर केले. आयपीएल २०२५ मधील अंतिम सामना ३ जून रोजी होणार आहे. या दरम्यान टीम इंडिया ए अनऑफिशियल टेस्टसाठी इंग्लंड दौऱ्यावर रवाना होणार आहे. अनऑफिशियल टेस्टमधील पहिला सामना हा ३० मे रोजी खेळवण्यात येणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्या नेतृत्वात बीसीसीआयने १४ सदस्यीय संघ निश्चित केला आहे. ओपनर यशस्वी जयस्वाल आणि विकेटकीपर बॅट्समन ईशान किशन या दोघांचा १४ खेळाडूंमध्ये समावेश असल्याचे म्हटले जात आहे. तसेच हे दोघे इंग्लंड लायन्स विरुद्ध अनऑफिशियल टेस्ट मॅच खेळणार असल्याचे म्हटले जात आहे. ईशान किशन याआधी संघात नव्हता. मात्र आयपीएलमध्ये २ खेळाडूंना झालेल्या दुखापतीमुळे ईशानला संधी मिळाली आहे.

बीसीसीआय निवड समितीने इंग्लंड दौऱ्यासाठी अशा १४ खेळाडूंची निवड केलीय,

ज्यांची टीम प्लेऑफसाठी क्वालिफाय करु शकणार नाही. त्या संघांचे साखळी फेरीतच आव्हान संपुष्टात येईल, अशाच टीममधील खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. यामध्ये ईशान किशन याचाही सामवेश आहे.

आयपीएल २०२५ स्पर्धेच्या तारीख जाहीर होताच पीएसएल सक्रिय

मुंबई । वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली होती. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणं उद्ध्वस्त केली होती. यामुळे चवताळलेल्या पाकिस्तानने दहशतवाद्यांच्या दबाबामुळे भारतावर हल्ले करण्यास सुरुवात केली होती. भारताने प्रत्येक हल्ल्याचे चोख प्रत्युत्तर दिले. तसेच पाकिस्तानला झुकण्यास भाग पाडले. पाकिस्तानने भारताकडे दया याचना मागितली आणि सीजफायरची घोषणा करण्यात आली. या तणावपूर्ण स्थितीत आयपीएल आणि पीएसएल या दोन्ही स्पर्धा स्थगित करण्यात आल्या होत्या. बीसीसीआयने आयपीएल स्पर्धेतील उर्वरित सामने १७ मे पासून सुरु करण्याची घोषणा केली. असे असताना आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पीएसएलच्या उर्वरित सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

गुरुवार, दि. १५ मे २०२५

--* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

मेष – नको ती माणसे अशी माणसे भेटतील.
वृषभ – संसारात रममाण व्हाल.
मिथुन – मनाविरूध्द कार्य होतील.
कर्क – शेतकरी वर्गास उत्तम दिवस.
सिंह – मातृ संबंधात तणाव निर्माण होईल.
कन्या – प्रत्येक कार्यात यश मिळवाल.
तूळ – नवीन कामी मन लागेल.
वृश्चिक – आजचा दिवस आनंदाचा आहे.
धनू – साडेसाती संपली असे समजू नका.
मकर – साडेसातीचा उरलेला भागाचे परिणाम होतील.
कुंभ – जरा सबुरीने वागा, साडेसाती आहे.
मीन – साडेसातीत खोटे बोलणे त्रासदायक ठरेल.

रोहित शर्मा १० महिन्यांनंतर पुन्हा 'वर्षा'वर

मुंबई । वृत्तसंस्था

टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा याने अवघ्या काही दिवसांआधी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. रोहितने त्याआधीच टी-२० फॉर्मेटमधून निवृत्ती जाहीर केलीय. त्यामुळे आता रोहित फक्त एकदिवसीय क्रिकेटमध्ये खेळताना दिसणार आहे. रोहितच्या कसोटी निवृत्तीनंतर अनेक स्तरातून त्याला शुभेच्छा दिल्या जात आहेत. निवृत्तीच्या काही दिवसानंतर आता रोहितने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. देवेंद्र फडणवीस यांनी रोहितसोबतचे काही फोटो पोस्ट करुन याबाबतची माहिती दिली. फडणवीस यांनी रोहितला कसोटी निवृत्ती नंतरच्या उर्वरित प्रवासासाठी शुभेच्छाही दिल्या. रोहित शर्मा याची मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी जाण्याची ११ महिन्यांमधील दुसरी वेळ ठरली.

रोहित ११ महिन्यांत दुसऱ्यांदा वर्षावर

दरम्यान रोहितची 'वर्षा'वर जाण्याची

हिटमॅनने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

११ महिन्यांमधील दुसरी वेळ ठरली. टीम इंडियाने २९ जून २०२४ रोजी रोहितच्या नेतृत्वात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत टी २० वर्ल्ड कप उंचावला होता. त्यानंतर टीम इंडियाचा भारतात आणि मुंबईत जोरदार स्वागत करण्यात आले होते. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५ जुलै रोजी रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जयस्वाल या वर्ल्ड कप विजेता संघातील खेळाडूंचे वर्षावर स्वागत केले होते. अशाप्रकारे रोहितची ही वर्षावर जाण्याची गेल्या ११ महिन्यांमधील दुसरी वेळ ठरली.

मुख्यमंत्र्यांचा अनेक विषयांवर संवाद

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोहितसोबत अनेक विषयांवर संवाद साधला. तसेच रोहितला निवृत्तीनंतर पुढील प्रवासासाठी शुभेच्छाही दिल्या. वर्षा माझ्या अधिकृत निवासस्थानी भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्माचे स्वागत करणे, त्यांना भेटणे आणि त्यांच्याशी संवाद साधून खूप छान वाटले. कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याबद्दल आणि त्यांच्या प्रवासाच्या पुढील टप्प्यात यश मिळावे यासाठी मी त्यांना शुभेच्छा दिल्या, असे फडणवीस यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटलेय.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ग.नं.६ राणी मेडिकलजवळ, धुळे-४२४००१ येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४. **RNI.No. 68336/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)